MMRC

## Colaba-Bandra-SEEPZ Metro-3 Corridor

# मल्टी-मॉडल इंटीग्रेशन मुळे एक्वा लाइन वरील प्रवास होणार सुलभ

मुंबई, १३ ऑक्टोबर, २०२४- एक्वा लाइन वरील प्रवास सुलभ करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (MMRC) द्वारे सर्व भागधारक आणि सेवा प्रदात्यांच्या समन्वयाने मल्टी-मॉडल इंटीग्रेशन साठी (MMI) विविध उपाय योजना करण्यात येत आहेत.

प्रमुख ठळक मुद्दे:

- MMRC कंत्राटदारांनी BKC वगळता (जेथे आयकर जंक्शनवर मोठ्या पुनर्स्थापनेचे काम सुरू आहे जे 6 आठवड्यांत पूर्ण होईल) वगळता, सर्व भूमिगत स्थानकांमध्ये आणि आजूबाजूला रस्ते पुनर्स्थापित केले आहे.
- मल्टी-मॉडल इंटीग्रेशनचे महत्त्व लक्षात घेता विशेषत: स्थानकाजवळ येणा-या/जाणाऱ्या प्रवाशांची सुरक्षित आणि सोय हे केंद्रबिंदू मानून. एम एमएमआरसीने , सर्वसमावेशक मल्टी-मॉडल इंटीग्रेशन नियोजनासाठी वाहतूक पोलिस, BEST, BMC आणि MIAL यांच्याशी गेल्या काही महिन्यांपासून संवाद सुरू केला आहे व अंमलबजावणीसाठी आधीच विविध कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यापैकी काही कामे पूर्ण झाली आहेत तर काही प्रगतीपथावर आहेत.
- मेट्रो स्थानकां मधून इतर वाहतूक सुविधेद्वारे प्रवेश व निकास सुलभतेसाठी पुढील कामे पूर्ण झाली आहेत

- मेट्रो लाईन 1 पासून एक्वा लाईनच्या मरोळ नाका स्थानकांच्या कॉन्कोर्सपर्यंत सर्वात नजीकच्या प्रवेश/निकास स्थानास जिन्या द्वारे जोडणे
- वातानुकूलित भूमिगत पादचारी क्रॉसिंग मुख्य रस्त्याच्या खाली स्टेशनसह जोडणे; MIDC सेंट्रल रोड, WEH आणि वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स रोड
- विमानतळ प्रवाशांसाठी CSMIA T1 आणि T2 स्थानकांवर झाकलेली पादचारी छत
- सांताक्रूझ मेट्रो स्टेशन सांताक्रूझ (WR) उपनगरीय स्थानकापासून 800 मीटर स्कायवॉकने जोडलेले आहे
- मूलभूत माहिती चिन्हे, रस्ता खुणा आणि पादचारी क्रॉसिंग

चालू असलेली कामे:

- फूटपाथ जीर्णोद्धार आणि सुधारणा (अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे थोडा विलंब झाला)
- लिफ्ट आणि एस्केलेटरने सुसज्ज असलेल्या सर्व 10 मेट्रो स्थानकांचे प्रवेश/निर्गमन हळूहळू तयार होत आहेत.

“मल्टी-मॉडल इंटिग्रेशनच्या कामांच्या पूर्ततेमुळे, Aqua line वरील प्रवाशांना येत्या काही आठवड्यांमध्ये सुखद प्रवासाचा अनुभव घेता येईल. मेट्रो स्थानके व इतर वाहतूक सुविधां दरम्यान सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाच्या सोई उपलब्ध करून देण्यावर आमचा भर आहे. यामुळे प्रवाशांना खूप फायदा होईल”, व्यवस्थापकीय संचालक श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या.

मल्टी-मॉडल इंटीग्रेशन अंतर्गत येणारी कार्ये;

MMRC

| क्र. | मल्टी-मॉडल इंटीग्रेशन तपशील | स्थिती | स्थानकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मेट्रो लाइन १ सह एकत्रीकरण; जवळच्या निर्गमनापासून भूमिगत स्थानकापर्यंतच्या जिन्याचे काम | पूर्ण | मरोळ नाका स्थानक |
| २ | भूमिगत स्थानकाद्वारे प्रमुख रस्त्या खाली वातानुकूलित पादचारी क्रॉसिंग बनविणे | पूर्ण | **सीप्झ** (एम आय डी सी सेंट्रल रोड), सहार रोड, सांताक्रूझ (WEH), वांद्रे कॉलनी आणि बीकेसी (BKLR) *अन पेड एरिया* |
| ३ | मेट्रो स्थानक प्रवेश चिन्ह/रोड मार्किंग | पूर्ण / प्रगतीपथावर | सर्व स्थानके |
| ४ | फूटपाथ सुधारणा आणि नवीन पादचारी पथ | प्रगतीपथावर | सर्व स्थानके |
| ५ | ऑटो/टॅक्सी स्टँड चिन्हे | पूर्ण | आरे जे वी एल आर , **सीप्झ** एम आय डी सी -अंधेरी आणि मरोळ नाका |
| ६ | विमानतळ स्थानकांवर कव्हर कॅनोपीसह पदपथ | पूर्ण | सी एस एम आय ए टी २ & सी एस एम आय ए टी १ |
| ७ | विमानतळ प्रवाशांसाठी फीडर बस सुविधा | नियोजित प्रारंभ; १५ ऑक्टो. २०२४ | सी एस एम आय ए टी २ |
| ८ | बेस्ट बस सेवा;<br>• विद्यमान मार्गांचे पुनरावलोकन आणि बस थांब्यांची पुनर्रचना<br>• नवीन मार्गिकेची सुरुवात<br>• नवीन बस थांबे आणि रांगेसाठी निवारे (माहितीसह) | १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत बेस्टच्या समन्वयाने अंमलबजावणी केली जाईल | सर्व स्थानके |
| ९ | अधिकृत विक्रेत्यांद्वारे कार आणि बसेससाठी ईव्ही चार्जिंग सुविधा | १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत | आरे जे वी एल आर , **सीप्झ** आणि बीकेसी |
| १० | कलिना कॅम्पस पर्यंत पादचारी पूल | नियोजित. ६ महिन्यांत तयार होईल | वांद्रे कॉलनी स्थानक |
| ११ | सिग्नल जंक्शनसह पूर्ण रस्ता पुनर्स्थापित | १ डिसेंबर २०२४ | बीकेसी स्थानक (आयटी जंक्शन) |